परिपत्रक

<u>तात्काळ / महत्वाचे</u>

जा.क्र.शावैमवि/शावैमरुमि/मत्ता व दायित्व/वर्ग१,२,३/ २९८० /२०२५
अधिष्ठाता यांचे कार्यालय,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,मिरज
दिनांक :-०७/०४/२०२५.

विषय :- मत्ता व दायित्वे यांचे विवरणपत्र सादर करणेबाबत..

संदर्भ :- १) शासन निर्णय क्र.सीडीआर-१००१/८१४/प्र.क्र.१४/०१/११, दि.०१-०१-२००२
२) शासन परिपत्रक क्र.संकिर्ण-१००९/प्र.क्र.१५४/१९, दि.०२-०३-२००९
३) संचालनालयाचे समक्रमांक दिनांक ३१-०८-२०१४, दि.१८-०४-२०१६, दि.०१-०६-२०१६, दि.२१-०७-२०१६ व दि.१८-०४-२०१७ चे परिपत्रक

उपरोक्त विषय व संदर्भीय पत्रानुसार या परिपत्रकाव्दारे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मिरज आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,मिरज या संस्थेच्या आस्थापनेवरील वर्ग १,२ आणि ३ संवर्ग व नर्सिंग परिचर्या या पदावर कार्यरत अधिकारी आणि कर्मचारी यांना कळविण्यांत येते कि, शासन नियमानुसार प्रत्येक वर्षाच्या अखेरीस म्हणजेच, दिनांक ०१ एप्रिल ते दिनांक ३१ मार्च अखेरचे मत्ता व दायित्वे बाबतचे विवरणपत्र बंद लखोटयात आपणाकडून संबंधित आस्थापना विभागास सादर करण्यांत येत असतात.

संदर्भीय पत्रान्वये सन २०२४-२०२५ या वित्तीय वर्षाचे दिनांक ३१ मार्च २०२५ च्या स्थितीस अनुसरुन मत्ता व दायित्व् बाबतची माहिती विहित विवरणपत्रात कार्यरत असलेल्या आस्थापना शाखेकडे दिनांक २० एप्रिल, २०२५ पुर्वी सिलबंद लखोटयात सादर करण्यांत यावीत.

सदरची बाब हि सेवा विषयक बाबींशी संबंधित असल्याने सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी विहित वेळेत सिलंबद लखोटयात संबंधित संस्थेतील संबंधित आस्थापना शाखेस माहिती सादर करावी.

मत्ता व दायित्वे यांचा विहित विवरणपत्राचा नमुना संस्थेच्या gmcmiraj.edu.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,मिरज
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,मिरज
पदमभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय,सांगली
आरोग्य शिक्षण पथक तासगांव

प्रति,
१) सर्व विभागप्रमुख, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज/शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, मिरज / पद्रमभूषण वसंतदादा पाटील, शासकीय रुग्णालय, सांगली./आरोग्य शिक्षण पथक तासगांव
२) वैद्यकीय अधिक्षक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, मिरज
३) अधिसेविका, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, मिरज
४) औषधभांडार प्रमुख, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, मिरज

२/- वरील १ ते ४ विभागप्रमुखांनी आपल्या विभागात कार्यरत असलेल्या सर्व अधिकारी व कर्मचा-यांच्या निदर्शनास सदरचे परिपत्रक आणावे.

प्रत:- जावक लिपीक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज/शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, मिरज /पदमभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय सांगली/आरोग्य शिक्षण पथक तासगांव

२/- सदरचे परिपत्रक प्रशासकीय कार्यालयातील सर्व लिपीक संवर्गाच्या कर्मचा-यांच्या निदर्शनास आणावे.

Scanned with OKEN Scanner